# पोलीस अधीक्षक कार्यालय
# बुलढाणा

## उद्योजकांना सुरक्षा व सुरक्षितता धोरणंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा यांची धाडसी कामगीरी

मा. मुख्यमंत्री म.रा. यांचे उद्योजकांना सुरक्षा व सुरक्षितता धोरणंतर्गत बुलढाणा पोलिसांची धाडसी कामगिरी. व्यापाऱ्याला लुटण्याचा कट उधळला, पिस्टल, चाकूसह ईतर किं.2, 13,000/-रु. मुद्देमाल जप्त., 05 अटकेत.

मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे संकल्पनेतून 100 दिवसांचा कृती आराखडा अंतर्गत जिल्ह्यातील उद्योजकांना सुरक्षा व सुरक्षितता पुरविण्यासाठी जिल्हा पोलीस घटक कटीबध्द राहून, जिल्हयात मालमत्ता व शरिराविरुध्द घडत असलेल्या घटनांना वेळीच प्रतिबंध घालून, गुन्यांमध्ये सहभागी व गुन्हे करण्याच्या तयारीत असलेल्या आरोपींची माहिती काढून, त्यांना गुन्हयाची तयारी करतांना पकडून, प्रचलित कायद्यान्वये प्रभावि कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. विश्व पानसरे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक बोरात, श्री. बी.बी. महामुनी यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेशीत केले होते. सदर संबंधाने पोनि. श्री. अशोक एन. लांडे प्रभारी अधिकारी, स्था.गु.शा. बुलढाणा यांनी अधिनस्त पोलीस अधिकारी व अंमलदारांची स्वतंत्र पथके तयार करुन, त्यांना चोरी, घरफोडी, जबरी चोरी, दरोडा या व ईतर मालमत्ता संबंधीत गुन्हेगारांची माहिती काढून, त्यांचेवर लक्ष ठेवणे, जिल्ह्यात दाखल गुन्ह्यांची उकल करणे, गुन्ह्यास प्रतिबंध करणेबाबत सुचित केले होते.

सदर अनुषंगाने, दि.02/03/2025 रोजी बुलडाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास माहिती मिळाली की, बालाजी इंडस्ट्रीज-बिरसिंगपूर शिवारचे मालक श्री. नारायण सिनकर रा. बुलढाणा (तेलाचे व्यापारी) हे दिवसभराचे काम आटोपून रात्रीचे सुमारास माल विक्रीची रक्कम घेवून बुलडाणा स्थित घरी येतात. या बाबतची माहिती घेवून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांनी त्यांच्यावर पाळत ठेवून, या बाबतची टिप घेवून, त्यांना रस्त्यात अडवून, रक्कम लुटण्याचा कट रचून, तशी तयारी केली आहे. सदर माहितीवरुन स्था.गु.शा. पथकाने कार्यवाही केली असता, बुलढाणा शहर ते अजिंठा रोडवर कृषी विज्ञान केंद्र- बुलढाणा जवळ खालील आरोपी हे त्यांचे साथीदारांसह व्यापारी श्री. नारायण सिनकर रा. यांना अडवून, त्यांचे कडील नगदी रक्कम लुटण्याच्या उद्देशाने, दखलपात्र-गंभीर स्वरुपाचा गुन्हा करण्याच्या तयारीत असतांना मिळून आले वरुन पो.स्टे. बुलढाणा शहर येथे कलम 310(4), 310(5) मा.न्या.सं. सह कलम 3/25 आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.